

● डॉ.श्यामला वनारसे

# करमणूक :चार घटका ते चोवीस तास

**स्वातंत्र्य मिळाले त्यानंतर ‘भारती’ हे अनेक संस्थांच्या नावांना सार्वत्रिक स्वरूप स्पष्ट करण्यासाठी जोडल जाऊ लागले.**

**सिनेमा म्हणजे एक ‘स्वप्नभारती’ प्रकल्पाचे अलिखित नाव झाले.**

लेखांक ५ वा

## मनोरंजनाचा वाढता व्यापार :

**एकोणीसशे** एकोणचाळीस ते पंचेचाळीस ही वर्षे सर्व जगाला भयचकित करून सोडणारी युद्धाची वर्षे याबरोबरच ब्रिटिश साम्राज्याच्या अंताचा आरंभही झाला आणि नव्या कॉमनवेल्थची कल्पनाही अस्तित्वात आली. अशा प्रकारच्या आंतरराष्ट्रीय राजकीय धामधुमीचा काळ सिनेमावरही परिणाम करून गेला. सिनेमासाठी चाळीस ते पन्नास हे दशक म्हणजे स्टुडिओ ही निर्मितीसंस्था न राहता तांत्रिक सेवासुविधा देणारी व्यावसायिक जागा झाली. आर्थिक व्यवहार बदलले. सिनेमांतले तारे आणि तारका यांना अफाट पैसा आणि प्रसिद्धी मिळू लागली. प्रत्यक्ष सिनेमाच्या रचनेत भारतीय सिनेमामधल्या ‘मसाला फिल्म’ हा प्रकार निर्माण झाला आणि सिनेमाचे ग्राहक प्रेक्षक गळाला लागलेल्या माशासारखे त्याच त्याच अमिषाचे तुकडे गिळत राहिले. अर्थात याचा सर्वस्वी व्यापारनिष्ठ व्यवहार अजून दिसू लागला नव्हता किंवा लक्षात आला नव्हता असे म्हणू.

एकीकडे काळ कठीण होता. युद्ध टंचाई महागाई आणि स्वतंत्र भारताचे स्थान बघणारी आणि त्या प्राप्तीसाठी अधीर झालेली तरूणाई अशी कधी नव्हे इतकी भारतीय समाजाची ओढाताण चालू होती. भारतीय समाजात विशेषत: महाराष्ट्रात आर्थिक ओढघस्तीने मध्यमवर्गात आणि निम्नमध्यमवर्गात स्त्रियांनी नोकरीसाठी घराबाहेर पडण्याचे प्रमाण वाढले. स्त्रीशिक्षणाची स्थिती महाराष्ट्रात बरी असल्याने घर सावरण्यासाठी हातभार लावणे महिलांनी मनावर घेतले. रेशनिंग आणि महागाई यांच्या कात्रीत नित्यव्यवहार आणि नैमित्तिक कार्येही दबावाखाली आली. बेचाळीसची चळवळ सर्वांनीच स्वतंत्रतेसाठीचा अंतिम निकराचा लढा म्हणून पाहिली. प्रत्यक्ष सहभाग घेणाऱ्यांमध्ये नवतरूणांची मोठी संख्या होती. त्यात बंगालमधला दुष्काळ आणि त्यावरून वाढलेली चीड आणि दुसरीकडे दुरवस्था यांत पिचलेले जीवन स्वतंत्र भारताचा झेंडा उंचावणार होते.

स्वातंत्र्य मिळाले पण फाळणीही झाली. तरीही जल्लोष आणि नव्या प्रश्नांची झुंज यांनी हेलकावणारे जीवन युद्धाच्या मागे राहिलेल्या विध्वंसातूनही पुढे जायचे ते जातच राहिले. त्याही जीवनात रंजनाची गरज भागवायला सिनेमा सरसावत होताच. देशभक्ती ग्रामीण गुन्हेगारी, तत्वनिष्ठा ही कथाकेंद्रे होती. भारतमाता हे रूपक अतिशय लोकप्रिय होते. जीवनात ‘काळी माती’ आईच्या जागी होतीच. अन्यायग्रस्त समाजात गुन्हेगारीला एक प्रकारची मान्यता निर्माण होते. तशीही परतंत्र भारतात निर्माण झालेली होतीच त्यामुळे नाट्यमयतेला आणि संवादांच्या चमकदारपणाला खाद्य तयार होते. गुन्हेगार हा एक परिस्थितिवशात वाममार्गाला लागलेला पण मुळातच भला माणूस ही कल्पना रॉबिनहुड छाप म्हणून लोकप्रिय होतीच. त्यात कुटुंबात आई बहीण इ. पात्रे आणून अतिरंजित किंवा भावविवश चित्रणालाही वाव होता. चित्रणाच्या तंत्रात प्रगती चालूच होती. पण तंत्र आणि सामग्री आयात करण्यात बराच खटाटोप असे. युद्धामुळे तेही कठीण झाले होतेच. कथा सांगण्यातली वाकबगारी वाढतच गेली होती आणि ‘ध्येयवादी’ राष्ट्रीय प्रवृत्तीविषयी आस्था बाळगणारे लोक सरकारी नजरा चुकवून इतिहासगौरवाचा मार्ग पत्करत होती. एकीकडे ताण आणि दुसरीकडे स्वतंत्र बनण्याची आकांक्षा यांना सार्वजनिक पातळीवर बोलता येऊ लागले होते. आणि तरीही चांगल्या कथेवर केलेला सिनेमा आवडला की ती चांगली अभिरूची असे बाळबोध वळणच राहिले होते. धंदा चालण्याइतकी भाबडेपणाने करमणूक स्वीकारणारा प्रेक्षकवर्ग शहरात होताच आणि तंबूतला सिनेमाही ‘तेवढीच गंमत’ म्हणून लहान ठिकाणी पसरत पोचत होता. या सर्व प्रकारात सिनेमा बघण्यासाठी उत्तम यंत्रसामग्री हवी ही अटसुद्धा या आपल्या चिरगरीब देशात मागे राहिली आणि खराब झालेल्या तुटलेल्या फिल्माही लोकांनी पैसे देऊन पाहिल्या. या दशकात पोटासाठी शहर गाठण्याचा वेग वाढला. याचा करमणुकीच्या धंद्याच्या लेखी ‘अधिक मोठी प्रेक्षकसंख्या’ असा अर्थ झाला. या काळात आलेला ब्लॉकबस्टर ‘किस्मत’ कलकत्त्यात सलग तीन वर्ष चालला यात जसा तोच सिनेमा पुन्हा पुन्हा पाहण्याचा भाग आहे तसाच आधी दूर राहिलेला प्रेक्षक ‘बघू तरी काय आहे एवढं’ असं म्हणत येत राहिला याचाही भाग आहे. खूप दिवस चाललेला सिनेमा सामाजिक व्यवसायात गप्पांच्या पातळीवरही दाखल होतो मग त्यात भाग घेता यावा हाही एक मुद्दा प्रेक्षकाला ओढू लागतो. तरूण मित्रमंडळी नित्याच्या गप्पात कोणते विषय दाखल करतात यात राजकारणापाठोपाठ सिनेमा आला हे या दशकाचे वैशिष्ट्य म्हणता येईल.

शोभना समर्थ आणि प्रेम अदीब यांच्या भूमिका असलेला ‘रामराज्य’ व्ही. शांताराम यांनी काढलेला ‘शकुंतला’ आणि ग्यान मुखर्जी यांचा ‘किस्मत’हे तिन्ही चित्रपट उत्तम चालले. लोकप्रियतेच्या निकषावर त्यामधील काय पसंत झाले आणि काय दीर्घकाळ समाजजीवनात जिवंत राहिले याकडे पाहणे मोठे रंजक आहे.

किस्मत यामधला अग्रणी. या सिनेमामधून अशोककुमार हा सुपरस्टार जन्माला आला. गुन्हेगार ‘हिरो’ म्हणजे मूळचा भला पण परिस्थितीने वाममार्गाला लागलेला तरूण अशा स्वरूपात दाखल झाला. गाणी यात भजन देशभक्तीचे संचलनगीत अंगाई हे प्रकार आले. त्यात कथेच्या रचनेमधे बालपणातली ताटातूट ही युक्ती आली. श्रीमंतांना लुटून गरिबांचे भले करण्याची प्रेरणा आली.

(पान १४ वर)

# परिक्रमा

## ‘अर्धसत्य’चा उत्तरार्ध येत आहे



गोविंद निहलानी दिग्दर्शित ‘अर्धसत्य’ (१९८३) ऐंशीच्या दशकांत खूपच गाजला होता. श्री. दा. पानवलकर यांच्या कथेवरून विजय तेंडुलकरांनी ‘अर्धसत्य’ची पटकथा लिहली होती. ही पटकथा राजकपूरला एवढी आवडली की ताबडतोब त्याने विजय तेंडुलकरांना बोलावून ‘राम तेरी गंगा मैली’ची पटकथा दुरुस्त करायची विनंती केली. तेंडुलकरांनी अर्थात याला नकार दिला.

अशा लोकप्रिय ठरलेला व गाजलेला ‘अर्धसत्य’चा उत्तरार्थ ३० वर्षानंतर गोविंद निहलानी दिग्दर्शित करणार आहेत. गोविंद निहलानी सध्या या चित्राच्या पटकथेवर काम करीत आहेत. ती पूर्ण होताच या वर्षअखेर चित्रपट सेटवर जाईल. मात्र ‘अर्धसत्य’ जिथे संपला तेथे नवा चित्रपट सुरू होत नाही. या चित्राची कथा वेगळी असेल. पटकथा पूर्ण होइपर्यंत कलावंत कोण घ्यायचे हे गोविंद निहलानी ठरविले नाही. ‘अर्धसत्य’मधे ओमपुरी, स्मिता पाटील, सदाशीव अमरापूरकर व नासीरुद्दीन शहा यांच्या भूमिका होत्या. अर्धसत्य मधील रामा शेट्टीच्या भूमिकेमुळे सदाशीव अमरापूरकर हिंदीत नट म्हणून प्रस्थापित झाला. दरम्यान ‘कमलू हॅपी हॅपी’हा निहलानी दिग्दर्शित ॲनिमेशनपट दिवाळीला प्रकाशीत होईल हा चित्रपट लहान मुलांसाठी आहे.

## सोफीया लॉरेन ७८व्या वर्षी भूमिका करतेय

हॉलीवूड मधे गाजलेली इटालीयन अभिनेत्री सोफीया लॉरेननें २००९ मधे ‘नाइन’या हॉलीवूड चित्रपटात शेवटची भूमिका केली.पण आता ७८व्या वर्षी आपला मुलगा इदार्दो पोन्टी याच्या लघुपटात ती भूमिका करत आहे. फ्रेंच नाटककार कावनू याच्या एकांकिकेवरून हा लघुपट बनवला जातोय. व्हिट्टोरियो डिसिकाच्या ‘टु वुमेन’ (१९६२) या चित्रपटातील भूमिकेसाठी सोफियाला श्रेष्ठ अभिनेत्रीचे ऑस्कर मिळाले होते. क्लार्क गेबल, चार्लटन हेस्टन, मार्लन ब्रॅण्ट्रे इ. हॉलीवूडच्या श्रेष्ठ नटाबरोबर तिने भूमिका केलेल्या आहेत.

## ८ वे चित्रपट रसास्वाद शिबीर सप्टेंबरात

फेडरेशनचा महाराष्ट्र चॅप्टर आणि नॅशनल फिल्म आर्काइव्ह ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने ८ वे चित्रपट रसास्वाद शिबीर २० ते २६ सप्टेंबर या सप्ताहात पुणे येथील आर्काइव्ह थिएटर मधे संपन्न होणार आहे. शिबीरातली व्याख्यानें मराठीतून होणार असून १८ वर्षांवरील चित्रपट रसिकांना प्रवेश मिळू शकेल. शिबीरात व्याख्याने, रोज दोन चित्रपट असा भरगच्च कार्यक्रम असून शिबीर सकाळी ९॥ ते रात्रौ ९ पर्यंत रोज चालेल. शिबीराची माहिती व प्रवेश अर्ज नॅशनल फिल्म आर्काइव्हच्या www.nfaipune.gov.in या वेबसाइटवर उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी जकातदार ९८२२९७५८८२ यांच्याशी संपर्क करावा.

# ६ वा गोवा मराठी चित्रपट महोत्सव - २०१३

**-जनार्दन वेर्लेकर**



**गोवा मराठी चित्रपट महोत्सवाचे उद्‌घाटन उद्धव ठाकरे यांच्या हस्ते झाले.**

**उत्तम** कलाकृतींची निर्मिती आणि तिचा रसास्वाद हा जसा नयनोत्सव त्याहून अधिक सृजनोत्सव असतो. आशयघन चित्रपट कलाकृतीची पातळी-उंची गाठतात ती या अर्थाने. गोव्यात साजऱ्या झालेल्या (२८ ते ३० जून, २०१३) तीन दिवसीय चित्रपट महोत्सवाने असा निर्मळ आनंद गोव्यातील आणि गोव्याबाहेरून बहुसंख्येने आलेल्या चित्रपट दर्दींना भरभरून दिला. सदर महोत्सवाचे हे सहावे वर्ष. यंदा वामन हरी पेठे ज्वेलर्स आणि झी-२४ तास चित्रवाहिनी यांच्या संयुक्त विद्यमाने हा महोत्सव साजरा झाला आणि संजय शेट्ये यांच्या विन्सन वल्ड या आयोजक संस्थेने तो अतिशय दिमाखांत आणि सुविहितपणे आयोजित केला, गोव्याच्या राजधानीत मांडवीच्या तीरावर जणु, उतरली तारकादळे असा माहोल दिसून आला. यंदा चित्रपट तारे-तारकांसाठी लाल गालीचा अंथरण्यात आला. त्यांचे आगमन होताना त्यांचे बाइट्‌स घेण्यात आले. श्रोत्यांनी तुडुंब भरलेल्या मा. दिनानाथ कलामंदिरांत तारे-तारकांच्या मनोगतांचे थेट प्रक्षेपण करण्यात आले.

शिवसेनेचे कार्याध्यक्ष उद्धवजी ठाकरे यांच्या हस्ते समई प्रज्वलीत करून महोत्सवाचे उद्‌घाटन करण्यात आले. या प्रसंगी गोवा राज्याचे सभापती राजेंद्र आर्लेकर, कला-संस्कृतीमंत्री दयानंद मांद्रेकर, शिवसेना खासदार संजय राऊत, वामन हरी पेठे ज्वेलर्सचे आदित्य पेठे आणि मराठी चित्रपटसृष्टीतील आघाडीचे अनेक तारे-तारका, दिग्दर्शक, निर्माते आणि तंत्रज्ञ उपस्थित होते.

उदघाटन सोहळ्यापूर्वी वैभव मांगले (राजा), भार्गवी चिरमुले (राणी) आणि पुष्कर श्रोत्री (प्रधानजी) या त्रिकुटाने मौनी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग, उगवता सूर्य नरेंद्र मोदी आणि गोव्यात परिवर्तनाची लाट आणणारे मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर यांच्या अफलातून फिरक्या घेत सभागृहात हास्यरसाची खसखस पिकवली. एकमेकांना शाब्दिक कोपरखळ्या मारीत तिघांनी छान वातावरणनिर्मिती केली. भार्गवी चिरमुलेच्या लावणीनृत्याने सोहळ्याची लज्जत वाढवली. ललिता जोशी यांच्या नेटक्या सूत्रसंचालकाने आणि मान्यवरांच्या आटोपशीर भाषणांमुळे सोहळा थोडक्यात संपला.

आपल्या सकस अभिनयाने नाट्य आणि चित्रपटसृष्टी गाजवणारे बुजुर्ग कलाकार विक्रम गोखले यांना राजेंद्र आर्लेकर यांच्या हस्ते कृतज्ञता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. आदित्य पेठे यांच्या हस्ते सुंदर स्मरणिकेचे विमोचन करण्यात आले.

एकुण सोळा चित्रपट, एक परिसंवाद, चर्चासत्रें असा भरगच्च ऐवज हे यंदाच्या महोत्सवाचे आकर्षण होते. 'पुरुषप्रधान व्यवसायात आम्ही साऱ्याजणी' या परिसंवादात सुमित्रा भावे, मृणाल कुलकर्णी, क्रांती रेडकर, अश्विनी गर्दे यांचा सहभाग होता तर भारतीय सिनेमा आणि आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव, अर्थसहाय्य, सहनिर्मिती व मार्केटिंग या चर्चासत्रांची धुरा दिप्ती डीकुन्हा, रमण चावला, सतीश कटारिया आणि योगेश करीकुर्वे यांनी वाहिली.

यंदाच्या समारोहांतील अनुमती, आजचा दिवस माझा, बालक-पालक, पोस्टकार्ड, दिगंत (कोकणी), चिंटू-२, पुणे ५२, कोकणस्थ, कातळ (लघुपट) आणि प्रेमसूत्र हे चित्रपट उतरत्या क्रमाने मनाला भावले. गजेंद्र अहिरे लिखित-दिग्दर्शित आणि किंचित अभिनित 'अनुमती' यंदाच्या समारोहांतील हृदयस्पर्शी चित्रपट गोविंद निहलानी यांचे आल्हाददायी छायाचित्रण ही सुद्धा चित्रपटाच्या जमेची बाजू. सगळीं कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या निभावणाऱ्या रत्नाकर (विक्रम गोखले) या ध्येयवादी निवृत्त शिक्षकाची त्याच्या उत्तरायणात जिवलग पत्नीच्या (मधु) आकस्मिक जीवघेण्या आजारामुळे उदभवलेली आर्थिक असहाय्यता आणि तगमग हे या चित्रपटाचे कथासूत्र. मुलगा, सून, जावई, कन्या आणि नातवंडे असं गोकुळ असूनही रत्नाकर निराधार, एकाकीपणाने खचलेला. नव्या पिढीला ज्याचे त्याचे व्यापताप आहे. ते अधिक व्यवहारी आणि वास्तवाचे भान बाळगणारे. महागडे उपचार, पैसा उकळणारी हॉस्पीटले आणि डॉक्टर मंडळीचा हव्यास यांच्या कात्रींत मृत्युशय्येवर ती (नीना कुलकर्णी) आणि मरणयातना मात्र याला असे नियतीचे क्रुर चेष्टीत. त्याचे कोसळणे अनिवार्य. त्याच्या जुन्या मैत्रिणीने (रीमा लागू) त्याला मदतीचा हात देण्यापूर्वीच त्याची या निर्दय दुनियेंतून एक्झिट. सुबोध भावे, सई ताम्हणकर, किशोर कदम आणि आनंद अभ्यंकर, अरुण नलावडे यांचा तोडीस तोड अभिनय, विक्रम गोखले यांची उलघाल, तगमग पहाताना मन सुन्न होतं. आतड्याला पीळ पडतो. यंदाच्या समारोहांतील हा सर्वोत्कृष्ट चित्रपट.

चंद्रकांत कुलकर्णी दिग्दर्शित 'आजचा दिवस माझा' हा वेगवान घटनाक्रमांनी रसिकांनाबांधून ठेवणारा चित्रपट. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी (सचिन खेडेकर) बंडोबांना थंड केलं आहे. अशातच मुख्यमंत्री एका लग्न समारंभाला हजेरी लावतात. मुद्दाम उशिरा. कारण त्यांना आधी आलेल्या राज्यपालांचा पाणउतारा करायचा आहे.



**अभिनेते विक्रम गोखले यांच्या अभिनय कौशल्याचा गौरव**

मुख्यमंत्र्यांच्या स्वागतार्थ एकजात सगळे मान्यवर उभे रहातात. फक्त एकजण बसून राहिलेला. कायम गुर्मीत आणि सत्तेच्या कैफात वावरणाऱ्या मुख्यमंत्र्यांना त्या बसून राहिलेल्या व्यक्तीचें अशिष्ट वर्तन सहन होत नाही. मॅनरलेस या शब्दांत चारचौघांत मुख्यमंत्री त्याची निर्भत्सना करतात. यजमान मुख्यमंत्र्यांनी समजूत काढतात. कारण बसलेली असामी प्रसिद्ध गायक परंतु अंध आहे. ही भूमिका प्रसिद्ध गायक पं. चंद्रकांत लिमये यांनी छान साकारली आहे. आता मुख्यमंत्री वरमलेले. आठ वर्षांपूर्वी या गायकाने मुंबईंत सरकारी कोट्यांतून निवासस्थान मिळावे म्हणून अर्ज केलेला असतो. तो अर्थातच कुठेतरी धुळ खात पडलेला असतो. मुख्यमंत्र्यांना आपल्या उद्धट वर्तनाचे प्रायश्चित घ्यायचें आहे. एका दिवसांत त्या गायकाच्या हातीं निवासस्थानाच्या किल्ल्या द्यायला हव्यात असा आता त्यांचा राजहट्ट, प्रशासकीय मुखंडांना हा बालहट्ट वाटतो. मात्र मुख्यमंत्री आपल्या निर्णयावर ठाम. भ्रष्ट प्रशासकीय अधिकाऱ्यांचे उपरोधिकपणे वाभाडे काढणारा, मुख्यमंत्र्यांच्या सद्सद्विवेक बुद्धीला साद घालणारा आणि सत्ता हे जनतेच्या सेवेचं साधन हा साक्षात्कार एका साध्या प्रसंगामुळे ज्यांना घडला अशा मुख्यमंत्र्याची ही एका दिवसानी गोष्ट, अश्विनी भावे, महेश मांजरेकर, पुष्कर श्रोत्री, आनंद इंगळे यांच्या भूमिकाही लाजवाब.

रवी जाधव दिग्दर्शित 'बालक-पालक' हा चित्रपट खेळकरपणे एका महत्त्वाच्या समस्येला वाचा फोडतो. चाळींत रहाणाऱ्या एका मुलीने 'शेण खाल्लं' ही घटना या चित्रपटाच्या मुळाशीं आहे, चाळींत रहाणारी चार शाळकरी मुलें या प्रश्नाने हैराण आहेत. वडीलधाऱ्यांकडून त्यांना उडवाउडवीची उत्तरें मिळतात. लैंगिक प्रश्नांबाबत अनावश्यक गोपनीयता बाळगण्याच्या मोठ्यांच्या वृत्तीमुळे कोणते परिणाम मुलांवर संभवतात याचा वेध हा चित्रपट घेतो. पालकांना अंतर्मुख करणारा हा चित्रपट आवर्जून पहायला हवा.

प्रबोधनाची खरी गरज पालकांनाच आहे हे अधोरेखित करणारा हा चित्रपट उल्लेखनीय म्हणतां येईल. निखिल महाजन दिग्दर्शित पुणे-५२, गजेंद्र अहिरे दिग्दर्शित पोस्टकार्ड, ज्ञानेश मोघे दिग्दर्शित दिगंत, श्रीरंग गोडबोले दिग्दर्शित चिंटु-२, महेश मांजरेकर दिग्दर्शित बऱ्यांपैकी बटबटीत, प्रचारकी वळणाचा कोकणस्थ आणि तेजस देऊस्कर यांचा काहीसा उथळ, उठवळ असा प्रेमसूत्र हे चित्रपट मी महोत्सवांत पाहिले. मध्यंतरानंतर काहींशा रेंगाळणाऱ्या पोस्टकार्ड या चित्रपटाने यंदाच्या समारोहाचं सुप वाजलं, पुणे-५२ चित्रपटाने माफक आनंद दिला. दिगंत त्याच्या संयतपणामुळें मनाला भावला. शहरी आणि आदिवासी जीवनांतील तफावत एका प्रेम कहाणीच्या पार्श्वभूमीवर या चित्रपटांतून छान उलगडते. कातळ हा विक्रांत पवार दिग्दर्शित पुरस्कार विजेता लघुपट आवडला.

लंगर, तानी, चांदी, संहिता आणि प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं हे महोत्सवांत दाखवण्यात आलेले अन्य चित्रपट, संहिता पूर्वी पाहिलेला होता. अन्य चार चित्रपटांच्या आस्वादाला जरी मी मुकलों तरी त्यांचा उल्लेख टाळणे अनुचित ठरेल म्हणून त्यांचा उल्लेख आवश्यक वाटला. पोस्टकार्ड या समारोहाच्या समारोपाच्या प्रिमियरला गोवा राज्याचे वीजमंत्री मिलिंद नाईक आणि गोवा कला अकदमीचे अध्यक्ष विष्णु सूर्या वाघ खास उपस्थित होते. त्यांच्या हस्ते पोस्टकार्ड च्या टिमला सन्मानित करण्यात आलें. एक मंतरलेला चित्रपट महोत्सव आस्वादायची संधी संजय शेट्ये यांच्या 'विन्सन वल्ड' आणि त्यांच्या संपुर्ण टिमने आम्हा रसिकांना दिली. रसिक आणि कलाकार यांच्यातील प्रश्नोत्तरांच्या चित्रपट संपल्यानंतरच्या देवघेवीही प्रबोधनपर आणि उदबोधक होत्या.

●●●

पत्रसंवाद

## केनेडी ब्रिज नव्हे अर्देसर ईराणी ब्रिज

संपादक रुपवाणी

जुलै महिन्याच्या 'रुपवाणी'त श्री. बावकर यांनी आपल्या पत्रात सावेदादांची स्मृती जागविली आहे. सावेदादांचा स्टुडिओ व घर ऑपेराहाऊस जवळील केनेडी ब्रिज येथे होते. म्हणून केनेडी ब्रिजला 'सावेदादा ब्रिज' असे नांव देऊन सावेदादांची स्मृती जपावी असे लिहले आहे. परंतु केनेडी ब्रिजचे नामकरण मुंबई महापालिकेने खान बहादूर अर्देसर ईराणी ब्रिज असे केव्हाच केले आहे.

तसेच नीला उपाध्येंच्या लेखात पी.के. नायर यांच्यावरील माहितीपटाबद्दल लिहतांना उपाध्ये लिहतात फाळकेंच्या राजा हरिश्चंद्र ची रीळे मिळण्यासाठी प्रभातचे संस्थापक सेक्रेटरी सुधीर नांदगांवकर यांची मदत झाली याचा उल्लेख नायर यांनी करायला हवा होता. असे नमूद केले आहे. ते योग्यच आहे.

यावरोबरच फाळके संदर्भात रत्नाकर वाशीकर यांचाही उल्लेख करायला हवा. चळवळीतील धडपड्या माणसांना निरपेक्ष मनानें रत्नाकर वाशीकर मदत करायचे. प्रभात चित्र मंडळ, चतुरंग, विज्ञान परिषद या संस्थांना वाशीकरांनी सहाय्य केले. फाळके चित्रखजिन्याचा शोध प्रथम वाशीकरांमुळेच लागला.

**गिरीश कर्वे**
शीव, मुंबई-२२.



# क्लो•ज•अ•प



ज़ंजीर



उपकार



डॉन



नसीब

## 'प्राण'ज्योत निमाली

**खलनायकाच्या** भूमिका पडद्यावर रंगवून सुद्धा प्रेक्षकांच्या प्रेमाला पात्र ठरणारा 'प्राण' वयाच्या ९३व्या वर्षी या जगातून अंतर्धान पावला. तसा 'प्राण' १०/१२ वर्षापूर्वीच हिंदी पडद्यावरून निवृत्त झाला होता.

'प्राण'चे नांव उच्चारले की जुन्या प्रेक्षकांना राजकपूरच्या 'जिस देश मे गंगा बहती है'मधला राका डाकु आठवतो किंवा बिमल रॉय यांच्या 'मधुमती'मधला उन्मत जमीनदार, मनोजकुमारनें आपल्या 'उपकार'मध्ये मलंग बाबा ही प्रेक्षकांची सहानुभूती मिळवणारी भूमिका त्याला दिली होती. तर प्रकाश मेहरांनी 'जंजीर'मधे अनैतिक धंदे करणारा पण पोलीस इन्स्पेक्टर अमिताभच्या मैत्रीमुळे चांगला माणूस बनलेला 'लाला'ची भूमिका प्राणला दिली.

पडद्यावर खलनायक असलेला 'प्राण' वास्तव जीवनांत दिलदार सज्जन माणूस होता. एखादा पडद्यामागचा कामगार अडचणीत आहे हे कळताच 'प्राण'त्याला मदत करीत असे. निर्मात्यांना 'प्राण'ने कधी मोबदल्यावरून कैचीत पकडले नाही. चित्रपटसृष्टीत तेव्हा अनेक कॅम्पस होते. बी.आर.चोप्राच्या सिनेमात राजकपूर कधी दिसणार नाही. किंवा राजकपूरकडे एस.डी. बर्मन

कधी संगीत दिग्दर्शक असणार नाही. पण 'प्राण' कोणत्याही अशा गटात नव्हता. सर्वांकडे त्यानें भूमिका केल्या.

राजकपूरनें त्याला 'जिस देश में'साठी करारबद्ध केले तेव्हा 'प्राण'चा मोबदला देण्याएवढे पैसे राजकपूरकडे नव्हते. तेव्हा प्राणने एक रुपया मोबदला घेऊन राका डाकूची भूमिका केली.

## वाजपेयींची आठवण

१९७४ साल असावे. अटल बिहारी वाजपेयी मुंबईत आले होते. त्यांना विमानतळावर सोडण्यासाठी मी गेलो होतो.

दिल्लीचे विमान एकतास उशीरा सुटणार असे आयत्यावेळी जाहीर झाले. त्यामुळे विमानतळावरच विमान कधी सुटते त्याची वाट पहात बसावे लागले. त्यावेळी सांताक्रूझ विमानतळ आजच्या सारखा मोठा नव्हता. सिनेमातली माझी रुची अटलजींना ठाऊक होती. त्यांनाही सिनेमामधे खूप रस होता.

समोरच्या रांगेतील खुर्चीवर प्राण बसला होता. त्याचा मुलगा सुनील त्याच्या बरोबर होता. मी अटलजींना हळूच विचारले 'प्राण' समोर बसले आहेत बोलवू का त्यांना गप्पा मारायला? अटलजी गंमतीने म्हणाले 'हम व्हिलनसे बात नही करते.'

आमच्या दोघांच्या गप्पा सुरू झाल्या थोड्याच वेळात विमान सुटले.

एक महिन्याभराने वाजपेयी एका सभेसाठी मुंबईत परतले. त्यांना आणायला मी विमान तळावर गेलो. आम्ही मोटारीत बसताच अटलजी म्हणाले. ''उस दिन प्लेन में प्राण की सीट मेरे साथ थी. 'प्राण'ने खुद अपना परिचय करवा दिया. बहोत बाते हुई. 'प्राण' को भी राजनीतीमें रस है. और उनके बातो से ऐसा लगता था की प्राणसाहबभी राष्ट्रवादी विचारोंके है, तुम उनको मिलना.''

अटलजी प्राण साहेबांविषयी इतके कौतुकाने बोलत होते की एक महिन्यापूर्वीच आपण 'व्हिलन से नही मिलते' अस म्हटल्याचे पूर्णत: विसरले होते. 'प्राण'चे व्यक्तीमत्त्वच तसे होते. अटलजींच्या आज्ञेप्रामाणे मी 'प्राण'ना भेटायला सुरवात केली. माझी त्यांची ओळख शब्द कुमार या पत्रकाराने करून दिली. शब्दकुमार 'जर्नल ऑफ दि फिल्म इंडस्ट्री'चा कार्यकारी संपादक होता.

एकदा प्राण साहेबांच्या घरी आम्ही एक दोन पत्रकार गप्पा मारीत बसलो असतांना संजय गांधीच्या अरेरावी बद्दल वाटणारी चीड ते व्यक्त करतांना म्हणाले, संजय गांधी पेक्षा संजय चोप्रा मला महत्त्वाचा वाटतो. (त्याच वेळी दिल्लीत संजय चोप्रा नावाच्या तरुणाने आपल्या बहिणीची छेड काढणाऱ्या चार गुंडाशी सामना करून स्वत:चे प्राण गमावले होते.)

आणीबाणी विरोधात चित्रपट व्यवसाय इंदिरागांधी विरोधात उभा राहिला त्याचे नेतृत्व देव आनंदने केले. त्यामागे 'प्राण' साहेबांची प्रेरणा होती.

राज्यकर्त्याविरुद्ध सिनेमावाले कधीच उघड विरोधात उभे रहात नाही. ७७च्या निवडणुकीत अनेक सिनेमावाले इंदिरा गांधीच्या विरोधात उघडपणे 'जनता पार्टी'च्या बाजूने उभे राहिले.

प्राण जनता पार्टीच्या व विशेषत: वाजपेयीच्या जवळ असल्याचे कदाचित त्याला फाळके पारितोषिक मिळायला इतका उशीर झाला असावा. गेल्या 'मे' महिन्यात पुरस्कार मिळाला. तेव्हा ९३ वर्षाचे 'प्राण' दिल्लीला जाण्याच्या शारीरिक अवस्थेत नव्हते. म्हणून माहितीमंत्री मनीष तिवारींनी बांद्रा येथील त्यांच्या बंगल्यात जाऊन पुरस्कार दिला. आणि दोनच महिन्यात 'प्राण' ज्योत निमाली.

## शासनाचा स्तुत्य उपक्रम

या वर्षीच्या राष्ट्रीय चित्रपट पारितोषिकांत मराठी कलावंतांनी बाजी मारली. तेव्हा त्यांचा शासनातर्फे सत्कार करायचे सांस्कृतिक मंत्री संजय देवताळे यांनी ठरविले. त्यासाठी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांना निमंत्रित केले. आणि सह्याद्री गेस्ट



**मुख्यमंत्र्याच्या हस्ते सत्कार स्वीकारतांना विक्रम गोखले मुख्यमंत्र्यांच्या शेजारी सांस्कृतिक कार्यमंत्री देवताळे**

हाऊस वरील ऑडिटोरियम मध्ये कलावंताचा सत्कार ठेवला. पण वृत्तपत्रांनी ही बातमी छापलीच नाही. त्यामुळे शासनाने सत्कार केला हे सर्वसामान्य रसिकांना ठाऊकच नाही.

मला या सत्काराचे निमंत्रण ‘फिल्म सिटी’च्या संचालकांकडून मिळाले. सह्याद्रीवर सायंकाळी पोचलो तेंव्हा समजले गेल्यावर्षीही सांस्कृतिकमंत्री देवताळेंनी राष्ट्रीय पारितोषिक विजेत्या कलावंतांचा असाच सत्कार केला होता.पण वृत्तपत्रांनी त्याची दखल न घेतल्याने मलाही या उपक्रमाची कल्पना नव्हती तर सर्वसामान्य रसिकांना कोठून असणार? श्रेष्ठ अभिनेत्रीचे ‘धग’चित्रपटांतील भूमिके बद्दल पारितोषिक मिळवणारी अभिनेत्री उषा जाधव, ‘अनुमती’ मधील भूमिकेबद्दल श्रेष्ठ अभिनेत्याचा पुरस्कार मिळवणारे विक्रम गोखले, उत्कृष्ट दिग्दर्शनाचा पुरस्कार मिळविणारे ‘धग’चे दिग्दर्शक शिवाजी लोटन पाटील असे १०/१२ राष्ट्रीय पारितोषिक विजेते कलावंत उपस्थित होते. प्रेक्षकांमधे मराठी चित्रपट सृष्टीतले अगदी मोजकीच माणसे होती.

या समारंभात एक गम्मतच झाली. यावर्षी नुसता सत्कार न ठेवता सांस्कृतिक मंत्र्यांनी ५० हजार रु. चा पुरस्कारही ठेवला. मुख्यमंत्र्यांना समारंभातच हे समजले. त्यांनी तेथल्या तेथे पुरस्कार १ लाखाचा केला. उपस्थितांना आणि विजेत्या कलावंतांना हा सुखद धक्का होता. मात्र शासनाची प्रसिद्धी यंत्रणा डुलक्या काढित असल्याने शासनाचा हा स्तुत्य उपक्रम सामान्य रसिकांपर्यंत पोचला नाही हे दुर्दैव!

## मेरी कोम कोण?

संजय लीला भन्साली आपला पुढचा चित्रपट ‘मेरी कोम’हा चरित्रपट काढीत आहेत आणि मुख्य भूमिका प्रियांका चोप्रा करीत आहे.

मेरी कोम ही इम्फाळला रहाणारी आहे. ऑलीम्पिक मधे तिला ‘बॉक्सर’चे सुवर्णपदक मिळाले होते. ही बॉक्सरची भूमिका प्रियांका करते आहे. ‘आपल्या चित्रपट कारकीर्दीतली ही सर्वात कठीण आणि आव्हानात्मक भूमिका आहे’ असे तिला वाटते.

त्यासाठी इम्फाळला जाऊन ती मेरी कोमला भेटून आली. आणि भूमिका यथार्थ व्हावी यासाठी ३१ वर्षांच्या प्रियांकाने बॉक्सिंगचे धडे गिरवले आहेत. चित्रपटाचे शुटींग नुकतेच सुरू झाले आहे. प्रियांका चोप्राचे हे वर्ष खूपच धामधुमीचे आहे. *प्लेनस, जंजीर* (अमिताभच्या जंजीरचा रीमेक) *क्रिश-३* आणि *गुंडे* हे चार चित्रपट एका मागोमाग एक प्रकाशीत होत आहेत.

● **कॅमेरावाला**

## <u>दखल</u>

# 'भाग मिल्खा भाग' चे यश व चित्रपटाच्या लांबीची चर्चा

-दिलीप ठाकूर

**राकेश** ओमप्रकाश मेहरा दिग्दर्शित 'भाग मिल्खा भाग' या चित्रपटाने आजच्या बदलत्या व वेगवान जीवन शैलीत फक्त दोनच तासाचा चित्रपट असावा, त्यामुळे अशा चित्रपटाची चित्रफित प्रकाशित करणे सोपे जाते, मल्टीफ्लेक्स मध्येही एवढ्या कमी अवधीच्या चित्रपटाचे दिवसभरातील 'खेळांची संख्या'वाढते, गाण्यांशिवाय हे दोन तासाच्या अवधीचे चित्रपट सहज पूर्ण होतात, अशा अनेक प्रकारच्या समज-गैरसमजास-अपेक्षा-सल्ल्याना सणसणीत चोख उत्तर दिले आहे. अर्ध्या डझन गाण्यानी भरलेला हा क्रीडापटू मिल्खासिंगच्या आयुष्यावर घेतलेला चित्रपट चक्क तीन तास व दहा मिनिटे इतक्या अवधीचा असून त्याची संथगती व लांबी याबाबत कोणतीही तक्रार न करता रसिकांनी हा चित्रपट स्वीकारला.

तात्पर्य, कथेची गरज असेल तर चित्रपटाची लांबी कितीही असली तरी चालते आणि त्या कथेत प्रेक्षक गुंतला की त्या चित्रपटाची लांबी तो विसरतो व 'खोली' पाहतो.

राज कपूरचा *'संगम'* (१९६४) हा आपल्याकडचा सर्वाधिक लांबीचा पहिला चित्रपट होय. तीन तास अठ्ठावन्न मिनिटाच्या या चित्रपटाला दोन मध्यंतरे होती हे त्या काळात अप्रूप होते.पण पन्नास वर्षात फार मोठे सामाजिक-सांस्कृतिक बदल झाले, या दशकात तर चित्रपटाची लांबी आटोपशीर असावी असा एक विचार पुढे आला. तरी काही मोठ्या लांबीचे चित्रपट पाह्यचा योग आलाच. *डर* एक प्रेमकथा (तीन तास, दहा मिनिटे), *लगान* (तीन तास, चव्वेचाळीस मिनिटे), *हम आपके है कौन* (तीन तास सव्वीस मिनिटे), *हम दिल दे चुके सनम* (तीन तास आठ मिनिटे) *कभी खुशी कभी गम* (तीन तास बारा मिनिटे), *जोधा अकबर* (तीन तास चौदा मिनिटे) या सर्व चित्रपटांना रसिकांनी स्वीकारले. हिंदी चित्रपटाची प्रेक्षक संस्कृती कोणत्याही तराजूत वा फूटपट्टीने मोजता येणारी नाही, असेच या दीर्घ लांबीवाल्या चित्रपटाना मिळालेल्या यशा वरून म्हणावेसे वाटते. *'एलओसी कारगिल'* व *'व्हॉटस युवर राशी'* हे तीन तासापेक्षा जास्त कालावधीवाले चित्रपट नाकारले गेले, कारण ते फसले होते. याउलट अनुराग कश्यपने *'गॅंग्ज ऑफ वासेपूर'* पाच तासापेक्षा जास्त कालावधीचा बनवला व तो दोन भागात प्रदर्शित करताना रसिकांचा प्रतिसादही मिळवला.

पुन्हा एक तात्पर्य हिंदी चित्रपट कसे असावेत, ते किती कमी अवधीचे असावेत वगैरे बौद्धिके फारसे काही योग्य दिशेने विचार करीत नाही असे दिसते. चित्रपटाच्या विषयात 'दाखवण्यासारखे' काही विशेष असेल व पटकथाकार आणि दिग्दर्शकाची हाताळणी-मांडणी योग्य व प्रभावी असेल तर तीन तासापेक्षा जास्त कालावधीच्या चित्रपटाबाबत 'गर्दी'ची तरी तक्रार नाही. ●




**प्रा. श्वेता चितळे प्राचार्य डॉ. शाम जोशी व सुधीर नांदगांवकर**

## चिपळूणच्या डी.बी.जे कॉलेज फिल्म क्लब चे उद्घाटन

चिपळूणच्या डी.बी.जे. कॉलेजमधे कॅम्पस फिल्म सोसायटीचे उद्घाटन कॉलेजचे प्राचार्य डॉ. शाम जोशी यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख पाहुणे महणून फेडरेशनचे सुधीर नांदगांवकर उपस्थित होते. प्रा. श्वेता चितळे यांनी प्रास्ताविक केले व कॅम्पस फिल्म सोसायटीचे उद्दीष्ट सांगीतले. प्राचार्य श्याम जोशींनी मनोरंजनापेक्षाही अभिजात चित्रपटांचा आनंद कसा घ्यावा यासाठी फिल्म सोसायटी आहे, असे सांगीतले. नांदगांवकर म्हणाले सिनेमा हे आंतरराष्ट्रीय कलामाध्यम आहे. त्यामुळे कॅम्पस फिल्म सोसायटीत तुम्हाला जगभरचे चित्रपट पहायला मिळतील.

उद्घाटनानंतर 'चित्रपट रसास्वादाकडे' या विषयावर नांदगांवकर यांचे व्याख्यान झाले आणि नंतर *'चिल्ड्रेन ऑफ हेव्हन'* हा चित्रपट दाखविण्यात आला.

## जोशी-वकील कॉलेज फिल्म सोसायटीचा वर्धापन दिन साजरा

जोशी-वकील कॉलेज फिल्म सोसायटीचा वर्धापन दिन गोरेगांव (जि. रायगड) येथील महाविद्यालयातील कॅम्पस फिल्म सोसायटीने आपला तिसरा वर्धापन दिन नुकताच साजरा केला. प्रमुख पाहुणे या नात्याने फेडरेशनचे सेक्रेटरी सुधीर नांदगांवकर उपस्थित होते. उद्घाटनाच्या भाषणांत प्राचार्य गिरी म्हणाले, तीन वर्षापूर्वी सोसायटीचे उद्घाटन झाले तेव्हा आमच्याकडे सुसज्ज ऑडिटोरीयम नव्हते. पण आता फिक्स चेअर असलेले ऑडिटोरीयम आहे. ते फक्त १०० आसनांचे असल्याने फिल्म सोसायटीत फक्त १००च सभासद नोंदवले आहेत. यावर्षी विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे सेक्रेटरीपदासाठी निवडणूक घ्यावी लागली. उद्घाटनानंतर सुधीर नांदगांवकर यांचे चित्रपट रसास्वादाकडे या विषयावर व्याख्यान झाले.



**प्राचार्य गिरी उद्घाटन करतांना**

दृश्य पातळीवर ओळख पटवण्याची खूण म्हणून एखादा ताईत एखादे गोंदण अशा गोष्टी आल्या आणि नायिकेच्या व्यंगाविषयी कणव वाटणारा नायक अशा कितीतरी गोष्टी या पुढच्या काळात मसाला फिल्ममध्ये वारंवार दिसत राहणार होत्या.

पौराणिक कथानक ही अगदी दादासाहेब फाळके यांच्यापासूनच मान्यता पावलेली निवड. येथील लोकांना रंजनाची जी सवय होती त्यात प्रयोगकला चित्र शिल्प या सगळीकडे पुराणांना प्राधान्य होते. रामायण आणि महाभारत या महाकाव्यात भारतीय मानसिकतेचे. अनेक धागे चिवटपणे गुंतलेले होते. तीच गोष्ट संतपटाची. या काळात भारतीय समाज स्वातंत्र्याच्या आकांक्षेने भारून टाकणारे एकच व्यक्तिमत्त्व म्हणजे महात्मा गांधी रामराज्य ही संकल्पना राजकीय दृष्ट्या लोकांच्या मनात गांधीजींच्या विचारातून अंधुकपणे तयार होत होती. रामराज्याचा मुख्य अर्थ प्रचलित होता तो 'पोशिंदा' न्यायी आणि प्रजानुनयी राजा. गांधीजींनी त्यात स्वावलंबी प्रजेच्या साध्या राहणीच्या कल्पनेची भर घातली आणि श्रमनिष्ठेला स्वयंनिर्णयाला संयमाला महत्त्व दिले. या चित्रपटाबाबत त्याला चिकटलेले एक वलय म्हणजे गांधीजींनी हा चित्रपट पाहिला. हे वलय अशासाठी की तेवढा एकच चित्रपट गांधींनी त्यांच्या आयुष्यात पाहिला. गांधी विचारातला राम आणि जनमानसातील राम वेगळे होते. रामायणातील एकवचनी एकबाणी एकपत्नी रामाची संकल्पनाच जनमानसात दृढ राहिली होती. एक व्यक्ती म्हणून जबाबदारीने राजकीय निर्णयात सहभागी होणारी प्रजा ही आधुनिक संकल्पना अजूनही आपल्याला प्रत्यक्षात आणता आलेली नाही. त्या काळात तर आधुनिकता नवी होती तिच्याविषयी संभ्रम होते आणि गांधजींचा करके देखो चा मार्ग अनुसरायला आणि नव्या वाटा पाडायला वाव नव्हता इतकी जीवनाची गती वाढत चाललेली होती. सत्ताधारी म्हणजे बळाचा वापर करणारा स्वत:च्या वर कोणाचा आवाज जाणार नाही याची काळजी घेणारा. राखणदार म्हणजे राखण्याच्या तळ्याचं पाणी चाखणारा, मुलुखगिरी करणारा म्हणजे लूट आलीच अशा गतकालीन इतिहासातून तयार झालेल्या कल्पना हलवून नित्यव्यवहारात जबाबदार सार्वजनिक जीवन उभारण्याची तयारी होण्यापूर्वीच भारत स्वतंत्र झाला. त्यामुळे रामराज्य सारखा जनमानसातील चित्र न बदलता तीच कथा भव्य दृश्यांनी आणि सिनेमाच्या तंत्रांनी रंजक करणारा चित्रपट लोकांच्या पारंपारिक कल्पनांवरच विसंबून लोकप्रियता मिळवण्याची हमी घेऊन आला आणि चांगला धंदा करून गेला. यातले नैतिक संदेश लोकांना बदलाला अनुकूल करणारे असण्याचा मुद्दाच नव्हता. आपले जे चांगले आहे तेच धरून ठेवण्यावर रोख होता. पण त्यात 'किस्मत'वरचढ ठरला होता.ही गोष्ट अभिरूचीला वळण लागण्याच्या दृष्टीने महत्त्वाची आहे.

'शकुंतला' अभिजात संस्कृत साहित्याचा वारसा सांगणारी राजाच्या प्रेमकहाणीची या नव्या माध्यमातली व्ही, शांताराम यांची आकर्षक पेशकारी. त्यात जयश्रींची शकुंतला म्हणजे प्रामाणिक प्रेम करून समर्पण वृत्तीची स्त्री, पुरूषाची भ्रमरवृत्ती आणि स्त्रीच्या सत्त्वशीलतेचा विजय अशी लोकप्रियतेची हमी असणारी गोष्ट. एरव्ही या प्रकारे सत्त्वशीलतेचा विजय होतोच. अशी खात्री सुटतच चाललेली होती. त्यामुळे याला एक मनोरंजनाचे मूल्य होते. याचा तत्कालीन तरूणांच्या चाकोरीबाहेरच्या परिचयातून निर्माण होणारा स्त्रीविषयक आकर्षणाचा प्रश्न आणि त्यासाठी दोघांनाही तापदायक ठरणारा वडील मंडळींच्या मान्यतेचा प्रश्न या कथेशी सहज जुळल्यामुळे आणि प्रणयाचो

'भारतीय'चित्रण बघायला मिळत असल्यामुळे एक सार्वजनिक मान्यता असलेले प्रेम प्रकरण हे स्वप्नवत वाटणारे कथानक राजरोस विनासंकोच बघता येत होते. भारतीय सिनेमातील प्रणयदृश्ये जर आपण सलग बघत गेलो तर त्यातली शारीरिक जवळीक वाढत गेलेली त्यातले विभ्रम खुलत जाता जाता सूचकतेची पायरी मागे टाकून थेट आवाहक दिसणारे आणि नंतर प्रत्यक्ष प्रणयक्रीडा अधिकाधिक खुली करत नेणारे दिसतील याच्या तुलनेत त्या काळात वागण्याचे नियम जास्त कडक होते. स्त्रीचा पदर ढळणे, अंग प्रदर्शन करणारा पेहराव असणे, एकटीनेच प्रियाला भेटण्यासाठी एकांतस्थळी जाणे यासारखे प्रसंग बहुसंख्य मध्यमवर्गीय तरूणाईला वर्ज्य होते. काही प्रमाणात सभ्यतेच्या कल्पनांशी विसंगतही होते.पण या मानदंडावर सतत दृक्श्राव्य प्रतिमाचे आघात आणि व्यवहारात सैल झालेले ज्येष्ठाचे नियंत्रण यामुळे एकंदरीत तरूण प्रेक्षक सिनेमाच्या या करमणुकीवर खूष होता.

सिनेमा म्हणजे चटकदार अनुभव अशी भेळभत्त्याशी तुलना करण्याजोगी अनुभवमालिका कशी बनवता येईल. याकडे निर्मिती करणारांचे लक्ष होते. 'लोक' किंवा 'पब्लिक' आवडीनं काय बघतं यासाठी पेश केलेल्या चित्रपटांकडे नजर टाकली की लक्षात येतं की समोर काय आहे याबद्दल बोलायला किंवा सांगायला 'कथा'पकड घेणारी असली पाहिजे हे धोरण अगदी स्पष्ट होते. त्यासाठी कथानकात आणि संकलनात वळणे वाकणे आणि नाचगाणी 'पेरून ठेवणे' हे धोरणही या दशकात स्थिरावताना दिसते. सिनेमा बघताना अंधार केलल्या प्रेक्षागृहात पडदा आणि प्रेक्षक यांचे एकाचवेळी सार्वजनिक आणि आपापले व्यक्तिगत नाते निर्माण होत असते. थिएटरखेरीज अन्य पर्याय नसल्याने तिथे लागेल तो सिनेमा आणि दिसेल तो चित्रपट अशी ग्राहकप्रेक्षकांची स्थिती होती. निर्मात्यांनी काय दाखवले त्यातले किती नयनसुख आणि श्रवणसुख एरव्ही अशक्य होते याची तपासणी केली की सिनेमाने जो प्रेक्षक घडवला तो काही गोष्टी फिल्मी म्हणून मान्य करणाराच झाला. त्यामुळे तरुणांसमोर असे चित्रण सतत आणणे योग्य नव्हे अशा टिकेला तिकीट खिडकीवरच्या गर्दीनेच उत्तर दिले. पाकीटमारी करून पैसा मिळवणारा नायक प्रेमासाठी लढतानाही पाकीटमारीच करतो आणि शेवटी त्याला प्रेमिका आणि मान्यता अशा दोन्ही गोष्टी लाभतात अशी गोष्ट प्रत्यक्षात घडत नाही पण ती फिल्मी आहे म्हणून मान्य करा आणि त्यात रमून जा अशा प्रकारच्या प्रतिसादांची घडणही या दशकाने सुरू करून दिली.

स्वातंत्र्य मिळाले त्यानंतर 'भारती' हे अनेक संस्थांच्या नावांना सार्वत्रिक स्वरूप स्पष्ट करण्यासाठी जोडले जाऊ लागले.

सिनेमा म्हणजे एक 'स्वप्नभारती' प्रकल्पाचे अलिखित नाव झाले.

●●●


प्रभात चित्र मंडळाचे मासिक वास्तव रूपवाणी

**वार्षिक वर्गणी १००रु.**
**प्रभात सदस्य वा.व. ५० रु.**
**अन्य फिल्म सोसायटी**
**सदस्य वा.व. ७५ रु.**
**पाच वर्षांची ४००रु.**

वर्गणी **प्रभात चित्र मंडळ** या नावे मनी ऑर्डर अथवा डीडीने पाठवावी. बाहेरील गावचे चेक स्वीकारले जाणार नाहीत.

**प्रभात चित्र मंडळ :** शारदा सिनेमा, पहिला मजला, दादर, मुंबई-४०००१४.

भाग दोन

# ‘संस्कार’ची जन्मकथा

● **गिरीश कर्नाड**

**पण** चित्रपट प्रकाशित होईपर्यंत माझ्यात आणि पट्टाभिममध्ये तीव्र मतभेद झाल्यामुळे श्रेयनामावलीमध्ये पटकथा-लेखक म्हणून माझं नाव दिलं गेलं नाही.



**प्राणेश्वराच्या भूमिकेत गिरीश कर्नाड**

पटकथा-लेखनानं माझं समाधान झालं. कारण माझ्या मनात चित्रपट-दिग्दर्शक व्हायची इच्छा होती. अभिनय करायची मला अजिबात इच्छा नव्हती. मी पट्टाभिला सांगितलं, मला प्राणेशाचार्याची भूमिका नको. मी तुझा सह-दिग्दर्शक म्हणून काम करेन. मला दिग्दर्शनाचा अनुभव घ्यायचा आहे. पण पट्टाभिनं मला रंगभूमीवर पाहिलं होतं. अभिनयातली माझी कुवत त्याला ठाऊक होतो. माझ्याव्यतिरिक्त आणखी कुणाला विचारायचं, हाही प्रश्न होताच. तेलगू नटांचा त्याला आलेला अनुभव तितकासा बरा नव्हता. व्यावसायिक नटाला देण्याइतका पैसाही त्याच्यापाशी नव्हता. शिवाय स्नेहाला ‘ऑक्सफर्ड-छाप’ असलेल्या नटाबरोबर काम करायला लावण्यात त्याला विशिष्ट तृप्तीही असेल. एकंदरीत मीच प्राणेशाचार्यांची भूमिका करावी, असा पट्टाभिनं हट्ट धरला. तो हट्ट माझ्यासाठी अगदीच त्रासदायक होता, असं नाही.

पट्टाभिला कन्नड येत नसल्यामुळे नटांबरोबर बोलून संवाद म्हणून घेणं आणि योग्य पात्रांसाठी योग्य कलाकार निवडणं त्याला शक्यच नव्हतं. त्याला त्यात रसही नव्हता. मी निवडलेल्या सगळ्या कलाकारांची निवड त्यानं मान्य केली.

तरीही आमच्यासमोर समस्या आली ती अभिनेत्रींच्या निवडीची. बेंगळूरमध्ये चित्रपटात भाग घेण्यासाठी स्वखुशीनं पुढे आलेल्या हौशी अभिनेत्री फक्त दोघीच. वासुदेवची थोरली बहीण गोदा रामकुमार आणि भार्गवी नारायण. इतर सगळ्या महिला कलाकार ‘रंगभूमी असेल तर हरकत नाही, पण अय्याय्यो! सिनेमा? अजिबात नको! असं म्हणत. आम्ही काहीतरी भयानक गोष्ट करायला सांगतो आहोत, अशा प्रकारे नाक मुरडत राहिल्या अशा वेळी मद्रास प्लेअर्सची सदस्या लक्ष्मी कृष्णमूर्ती, विशालम एकांबरम, राणी बुर्रा, यमुना प्रभू, अमू मॅथ्यू याच सगळ्यात आधी पुढे आल्या. केशवपन केलेल्या लक्ष्मी देवम्माची भूमिका कोण करणार असा प्रश्न पुढे येण्याआधीच लक्ष्मी कृष्णमूर्ती ‘‘मी करेन ना! इतर स्त्री पात्रांपेक्षा त्यातच आव्हान आहे!’ म्हणाली, यमुना प्रभू यांनी रंगवलेल्या पद्मावतीची काही न बोलता

नजरेनंच प्राणेशाचार्यांना आत बोलावण्याची पद्धत बघून कन्नड चित्रपटसृष्टी चकित झाली.

याच सुमारास 'संस्कार' कादंबरी संक्षिप्त रूपात 'कस्तुरी' या नियतकालिकात प्रकाशित झाली आणि एक नवी समस्या आली. आतापर्यंत फक्त 'मनोहर ग्रंथमाले'च्या वाचकांना या कादंबरीच्या कथानकाची माहिती होती. आता ती कर्नाटकच्या घराघरापर्यंत पोहोचली. एका वाचकानं संपादकांना पत्र लिहिलं, ''जर अशा प्रकारे एखादं अनाथ शव पडून राहिलं असेल, तर त्याच्यावर मानवधर्माच्या नावाखाली मी अंत्यसंस्कार करीन. मृत व्यक्ती कोण आहे हे ठाऊक नसलं, तरी तिनं केलेलं पाप अंत्यसंस्कार करणाऱ्या मला अजिबात चिकटणार नाही, अशा अर्थाचा एक मंत्र आहे. त्यामुळे 'संस्कार' कादंबरीच्या केंद्रस्थानी असलेली समस्याच वाळूच्या इमारतीसारखी आहे!'' अश्या प्रकारे त्या पत्रलेखकानं मूळ समस्याच उधळून लावली. तिकडे दुर्लक्ष करून आम्ही आमचा उपक्रम चालूच ठेवला, हे वेगळं सांगायची गरज नाही.

१९६९च्या मध्यावर बाह्यचित्रीकरणाची ठिकाणं पक्की करण्यासाठी आणि टॉम कॅवनला त्याच्या कार्यक्षेत्राचा परिचय करून देण्यासाठी मी, वासुदेव, पट्टाभि आणि टॉम अशा सगळ्यांनी आगुंबेच्या प्रवासी बंगल्यावर ठाण मांडलं.

भोवतालच्या दोन-तीन अग्रहारांमध्ये फिरून आम्ही वैकुंठपूरला आलो, तेव्हा पट्टाभि. 'मी हे लोकेशन पाहिलंय!' म्हणत उतरून आलाच नाही. पट्टाभिच्या जमीनदारी संस्कृतीला शारीरिक मेहनतीचं वावडंही होतं. त्यामुळे आम्ही बाकीचे तिघंच तिथे गेलो.

त्या अग्रहारात पाऊल टाकताक्षणीच मला झालेला आनंद शब्दात सांगता येणार नाही. मनात असलेलं लोकेशन समोर येताच माझी अवस्था प्रथम दर्शनी प्रेमात पडलेल्या प्रेमवीरा सारखी झाली. अशा अवस्थेत रोमांचित व्हायचा अनुभव कुणाही दिग्दर्शकाला येतोच. हा अग्रहार 'संस्कार'साठी मुद्दाम बनवल्यासारखा होता. गेल्या किमान शंभर-दोनशे वर्षात तिथे काहीही बदल झाला नव्हता. (वीज आल्यामुळे अग्रहारात विजेचे खांब होते, पण त्यामुळे चित्रीकरणासाठी मदतच झाली.) लाकडात कोरलेले खांब, सिमेंट कॉंक्रीटचं वारंही नसलेली मातीच्या भिंतीची घरं, घरांसमोरची शेणानं सारवलेली अंगणं, धाब्याची माडी आणि गवताची छपरं, अग्रहारवासीही धोतर-आखूड बाह्यांचे अंगरखे-पंचे-शेंड्या-जानवी-कपाळांवर नाम अशा वेशातच वावरत असायचे, सगळं वातावरण 'संस्कार'च्या चित्रीकरणासाठी सज्ज होऊन असल्यासारखं होतं !

पण 'कस्तुरी'ची लोकप्रियता हीच एक समस्या होऊन बसली. पहिल्या भेटीच्या वेळी वैकुंठपुरातल्या रहिवाश्यांनी सगळ्यांचं प्रेमानं स्वागत केलं होतं. या खेपेला त्यांच्या चेहऱ्यावर काळजी होती. शास्त्री नावाच्या तिथल्या गृहस्थांनी मला तिथल्या एका घराच्या कट्ट्यावर बसवून सांगितलं, ''ही कादंबरी सनातन धर्माचं हनन करणारी आहे, अशी गडबड चालली आहे! आम्ही श्रृंगेरी मठाचे आश्रित आहोत. आमच्यापैकी एकांनी यक्षगान खेळ केल्यामुळे त्यांच्यावर बहिष्कार घालण्यात आला होता. त्यांना प्रायश्चित्तही घ्यावं लागलं होतं. त्यात ही कथा तर सरळसरळ माध्व समाजाशी निगडित आहे. आम्ही स्मार्त आहोत. आता तुमच्या चित्रीकरणाला संमती देऊन मठाचा कोप ओढवून घ्यायला आम्ही तयार नाही. तुम्ही आधी मठाची परवानगी घेऊन या. त्यानंतर सुखात पिक्चर बनवा!''

म्हणजे आणखी धावपळ करणं आवश्यक होतं. पट्टाभि त्या रात्री प्रवासी निवासात बसून अश्रू

ढाळू लागला, ''यांची मनोवृत्ती इतकी संकुचित असल्यांच स्पष्टपणे दिसत असताना चित्रपटाला का हरकत घेताहेत?'' म्हणत तो उसासे टाकू लागला. त्याला अग्रहारवासीयांची अडचणच लक्षात आली नव्हती.

टॉम मला म्हणाला, ''जर इथे चित्रीकरण करायला परवानगी मिळाली नाही, तर वासुदेवनं शोधलेल्या इतर कुठल्याही लोकेशनवर चित्रीकरण करणं शक्य आहे.''

पण मी हे मान्य केलं नाही. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे ही समस्या इतर अग्रहारांमध्ये डोकं वर काढणारच नाही, याची खात्री नव्हती. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे इतर अग्रहारांना विशिष्ट असा आकार नव्हता. इकडेतिकडे रस्ते, घरं होती, एवढेच. हे वैकुंठपूर तसं नव्हतं.

त्यात एकुलता एक रस्ता डोंगराच्या पायथ्यापासून सरळसोट जात होता. त्याच्या दोन्ही बाजूला दहा-बारा घरं होती. गल्लीच्या वरच्या बाजूला उंचावर सगळ्या अग्रहारावर सावधगिरीनं नजर ठेवणारं देऊळ होतं. त्याच्या भोवताली भिंत असून समोरच्या बाजूला एक अरूंद दरवाजा होता. मी टॉमला म्हटलं, ''त्या देवळाचं दार तट्टीनं झाकून त्याचा घर म्हणून वापर केला, तर त्याला नारायणप्पाचं घर म्हणून वापरता येईल. त्या बंद दरवाजामागचं सडणारं नारायणप्पाचं प्रेत संपूर्ण अग्रहारावर वर्चस्व गाजवत आहे. असा आभासही दृश्यमान करता येईल. तसेच गल्लीच्या तळाशी कॅमेरा ठेवून संपूर्ण अग्रहाराचा लाँगशॉट घेतला, की प्रत्येक वेळी ते घर नजरेला पडत राहील आणि त्या दारामागे पडलेलं नारायणप्पाचं प्रेत सतत प्रेक्षकाच्या मनात डोक्यात राहील. त्यात आजूबाजूच्या घरांचे बंद दरवाजे, त्यांच्या मधोमध असलेला ओकाबोका रस्ता, वरच्या टोकाला सगळ्या गावाला घाबरवणारं नारायणप्पाचं न दिसणारं प्रेत! अशा प्रकारे 'संस्कार'च्या केंद्रस्थानी असलेल्या समस्या आपण चित्ररूपानंही प्रभावीपणे दाखवू शकू.'' हे टॉमलाही पटलं.

आता आम्ही मठाच्या मागे निघालो. बेंगळूरच्या शंकरमठात शृंगेरी मठाचे स्वामी मुक्कामाला असल्याचं समजलं, म्हणून आम्ही तिकडे धावलो. मी सनातन धर्माला धक्का पोहोचणार नाही, अशा प्रकारे कथा थोडी इकडेतिकडे फिरवून सारांश लिहून काढला. कादंबरीच्या अखेरीस नारायणप्पाचे मुसलमान मित्र चोरून ते प्रेत घेऊन जातात आणि अंधारात जाळून टाकतात- हा शेवट मठाला मान्य होण्यासारखा नसल्यामुळे, प्राणेशाचार्यच अग्रहाराला येऊन प्रेतावर अंत्यसंस्कार करतात, असा बदल करून ते टिपण मठाच्या एका सेवेकऱ्याकडे दिलं. स्वामींनी ते वाचलं की नाही कोण जाणे, पण ''छान आहे, तुम्ही चित्रीकरण करायला आमची काहीही हरकत नाही. निसर्ग सुंदर आहे. हवा तसा वापरून घ्या!'' असं म्हणत त्यांनी परवानगी दिली. चित्रीकरणाचा मार्ग मोकळा झाला.

पण ते देऊळ नारायणअप्पाचं प्रेत पडलेलं घर म्हणून दाखवत असल्याचं मात्र आम्ही गुपितच ठेवलं. नाहीतर अग्रहाराच्या लोकांनीच गोंधळ माजवला असता.

चित्रपटाविषयीची आमची चर्चा जशी पुढे जाऊ लागली, तसे आमचे आपसातले मतभेद, वादविवाद बाहेर येऊ लागले. वातावरण अस्वस्थ होऊ लागलं. त्यामागे काही कारणं होती.'कलात्मक' चित्रपट म्हणजे 'बंगाली' चित्रपटांप्रमाणे असला पाहिजे, असा रेड्डी दांपत्याचा पूर्वग्रह हे त्यातलं एक प्रबळ कारण होतं. आपली बंगाली पार्श्वभूमी सिद्ध करण्यासाठी स्नेहा 'संस्कार' हा शब्दच 'शोन्शकार' अशा

प्रकारे उच्चारत होती. (काही वेळा मीही मग, मुद्दामच काय? काय शब्द तो? मी कधी ऐकलाच नाही! म्हणत तिची थट्टा करत असे.) पट्टाभि शांतीनिकेतनला जाऊन काही काळ तिथे विद्यार्थी म्हणून राहून आला होता. त्यामुळे आम्ही बनवत असलेला चित्रपट कन्नड असला, तरी त्यातलं सगळं वातावरण बंगाली असल पाहिजे, अशी दोघांचीही अपेक्षा होती.

एक दिवस पट्टाभि मला काहीतरी भलीमोठी समस्या असल्याप्रमाणे बाजूला घेऊन म्हणाला, 'गिरीश, चित्रपटात प्राणेशाचार्य मारुतीच्या मूर्तीच्या समोर बसून फुलाच्या प्रसादासाठी वाट बघतात, हे हास्यास्पद वाटतं, नाही का? मारूतीऐवजी देवीची मूर्ती ठेवली, तर त्या दृश्याला एक प्रकारचं गांभीर्य आणि सौंदर्य प्राप्त होईल. काय म्हणतोस?' मी घाबरा होऊन म्हणालो, ''अयो! माध्व ब्राह्मणांच्या दृष्टीनं मारुती म्हणजे प्राणदेव. आमच्याकडे देवी म्हटली की दलितांची देवता.'' पट्टाभि वाद घालत म्हणाला, ''पण हे प्रेक्षकांना कुठं ठाऊक असतं? मला तरी वाटतं, देवीच बरी होईल.'' मी दिड्मुढ होऊन वाय.एन.के. ना शरण गेलो. वाय.एन.के. नेहमीप्रमाणे आपल्या शैलीत, निम्मी थुंकी गिळत आणि निम्मेशिम्मे शब्द गिळत म्हणाले, ''नो नो! दॅट विल बी स्टुपिड! द फिल्म विल बिकम अ लाफिंग स्टॉक.'' आणि त्यांनी देवीला चित्रपटातून बाहेर काढलं. त्यानंतर पट्टाभिनं सहदिग्दर्शक म्हणून संगीतम श्रीनिवासराव नावाच्या माणसाला आणलं. तो माध्व समाजातला होता, त्याचबरोबर चित्रपट व्यवसायात राबणारा होता. त्यामुळे उपयुक्त ठरेल असा होता. तरीही त्याला कन्नड येत नव्हतं. म्हणजे पट्टभि, संगीतम आणि टॉम हा निर्देशन करणाऱ्या तिघांचा घोळका बिगर-कन्नड झाला. यावर मी आरडाओरडा केला. पण पट्टाभिनं नेहमीप्रमाणे ''घाबरू नकोस. तोही चांगला आहे. अनुभवीही आहे!'' असं सांगून माझं समाधान केलं.

या सगळ्या असंतोषावर तेल ओतलं ते फोटोग्राफर -पत्रकार राघवेंद्रराव यानं. त्यानं 'क़न्नड-प्रभा' मध्ये 'संस्कार' चित्रपटाच्या योजनेच्या संदर्भात एक लेख लिहिला. त्यानं आम्हा सगळ्यांना पट्टाभिच्या घरातच एकत्र बोलवून आमच्या मुलाखती घेतल्या, फोटो काढले आणि लेख लिहिला. लेखाचा उद्देश अर्थातच आमच्या या योजनेविषयी लोकांच्या मनात कुतूहल निर्माण करणं हा होता.पण या लेखाचा आमच्या युनिटवर जो काही परिणाम झाला, तो मात्र अनपेक्षित होता. तेवढाच तो प्रतिकूलही होता.

त्यावेळी मला नुकतंच संगीत-नाटक अकादमीचं पारितोषिक मिळालं होतं. वासुदेवला ललितकला-अकादमीचं राष्ट्रीय पारितोषिक मिळालं होतं. त्यामुळे कन्नड वाचकांना आमची नावं ठाऊक होती. कन्नड चित्रपटाच्या इतिहासातला पहिला विदेशी छायाचित्रकार टॉम कॉवन. त्यामुळे त्याचंही नाव कुतूहल वाढवणारं होतं. पण पट्टाभिराम रेड्डी कोण, ते कुणालाच ठाऊक नव्हतं. त्यामुळे त्याचं नाव म्हणजे एक अज्ञात तेलगू चित्रपट-निर्माता एवढंच होतं आणि त्या नावाविषयी कुणाला कुतूहलही नव्हतं. राघवेंद्रावच्या लेखात ही वस्तुस्थिती प्रतिबिंबित झाली होती. परिणामी मला आणि वासुदेवला अपेक्षेपेक्षा जास्त महत्त्व दिलं गेलं होतं. त्यामुळे सगळं साहस आपल्या खांद्यावर पेलणारा पट्टाभि काहीसा कोपऱ्यात सरला. यामुळे पट्टाभिपेक्षा स्नेहा अस्वस्थ झाली. या लेखानंतर युनिटमध्ये 'कन्नड विरूद्ध तेलगू' असा संघर्ष सुरू झाला. संघर्षाचं मुख्य कारण म्हणजे एक संपूर्ण लांबीचा चित्रपट बनवायचा अनुभव आमच्यापैकी कुणालाच नव्हता. त्यामुळे कुठल्याही चित्रपटाच्या वेळी अनिवार्यपणे सामोऱ्या येणाऱ्या लहानसहान समस्या आम्हांला मोठ्या

दिसू लागल्या. काहीतरी चुकतंय असं लक्षात आलं, की त्यावर चर्चा करून काहीतरी मार्ग काढण्याऐवजी 'या चुकीला जबाबदार कोण?' याचा शोध घ्यायला सुरुवात होऊ लागली. आमचा अनुभवहीन उत्साह प्रमाणापेक्षा जास्तीचे दोषारोप करण्यात परावर्तित होऊ लागला. मग समस्येचा तळ ठाऊक नसताना त्याच समस्येचं रूपांतर दोषात होऊ लागलं. त्याचंच पर्यवसान माघारी टीका-टिप्पणी करण्यात होऊ लागलं. या संदर्भात आमच्यामधला त्यातल्या त्यात अनुभवी माणूस म्हणजे टॉम कॉवन. त्यानं कॉमनवेल्थ डॉक्युमेंटरी फिल्म संस्थेसाठी साक्षी-चित्रांचा (डॉक्युमेंटरी) फोटोग्राफर म्हणून काम केलं होतं. एकदा मी त्याच्याशी बोलताना म्हणालो, ''आता आमच्यात वादविवाद आणि भांडणं चालली आहेत खरी, पण चित्रीकरण सुरू झालं की ते सगळं संपून जाईल.'' यावर तो अतिशय गंभीरपणे म्हणाला, ''सगळ्या चित्रपटांच्या युनिटमध्ये असल्या किरकिरी असतातच, त्यात दुर्दैवाची गोष्ट म्हणजे चित्रीकरणाच्या वेळी त्या वाढतात! कमी होत नाहीत.'' त्याची ही भविष्य वाणी आमच्या कल्पनेपेक्षा कठोरपणे खरी ठरली. 'संस्कार'ची योजना निम्म्यावर न कोसळता पुरी झाली, याचं मुख्य श्रेय टॉम कॉवनला दिलं पाहिजे. चित्रीकरणाच्या तारखा ठरल्या. मी ऑफीसमध्ये दोन वर्ष अजिबात रजा न घेता सहा आठवड्यांची राज साठवून ठेवली होती. पट्टाभि, वासुदेव, टॉम आणि मी माझ्या ऑफीसच्या हेरल्ड कारमधून निघालो. त्याकाळी बाजारात मिळणाऱ्या केवळ तीन मोटारींपैकी हेरल्ड ही सगळ्यात नाजूक गाडी होती. दूरच्या प्रवासासाठी ॲम्बॅसेडर योग्य गाडी होती. फियाट गाडी गावात फिरण्यासाठी टॅक्सी म्हणून लोकप्रिय होती. हेरल्ड गाडी म्हणजे ऑफीसला जाण्यासाठी अधिकाऱ्यांना आणि संध्याकाळी कुटुंबासमवेत पार्टीसाठी जाताना दरवाजे नसलेल्या मागच्या भागात मुलांना टाकून कुठेही जाण्यासाठी सुरक्षित असलेली 'शिष्ट' गाडी होती. तिचा चित्रीकरणाच्या वेळी निर्मिती-वाहन म्हणून केलेला वापर म्हणजे मी त्या वाहनावर केलेला अन्यायच म्हणावा लागेल.

श्रृंगेरीमध्ये आम्ही गेल्या-गेल्या मठाच्या अतिथीगृहामध्ये उतरलो असलो, तरी महिला येऊन दाखल होऊ लागल्या, तसं आम्हांला तिथून बाहेर पडून गावात भाड्यानं घेतलेल्या तीन-चार घरांमध्ये राहायला जावं लागलं. आम्ही पुरूषांच्या वस्तीच्या एका रांगेत झोपायचो. सकाळी परसात काही अंतरावर असलेल्या संडासाचा वापर करणं, त्यासाठी रांगेत उभं राहणं, न्हाणीघरात चुलाणावर तापलेल्या पाण्यानं उबदार आणि धुरकट वातावरणात आंघोळ करणं यामुळे मला तर आमचे शिरसीचे दिवस आठवले.

स्वयंपाक करायला योजलेल्या कंत्राटदाराची सर्व्हिस समाधानकारक नसल्यामुळे 'मल्लिका भवन'नावाच्या शिवळ्ळी ब्राह्मणांच्या भोजनालयात जेवायची व्यवस्था करण्यात आली. पुढच्या काळात चित्रीकरणाच्या संदर्भात अनुभवाला समाधान होईल असं जेवण मिळतं. दिवस जातील तसे त्यातले एकेक पदार्थ कमी होत जातात. अखेर जेवण म्हणजे केवळ सार-भात--पातळ ताक एवढंच राहातं. निर्मात्यांनी हॉटेलचं बिल भरलेलं नाही, हाच याचा अर्थ. बिल भरलं गेलं, की भात-सार-भाजी-सांडगे-पापड-दही अशा पदार्थांनी भरून थाटात ताट पुन्हा मिरवू लागतं. अशा प्रकारे जेवणाचं ताट बघून बजेट कुठपर्यंत येऊन पोहोचलंय, याचा अंदाज बांधणं सुलभ होऊन जातं.

● (शेवटचा भाग पुढील अंकी)

# संस्कृती संवादाचे अवशेष

● जी. के. ऐनापुरे



**कन्नड दिग्दर्शक गिरीश कासारवल्ली पुण्याच्या फिल्म इन्स्टिट्यूट मधून दिग्दर्शनाचा डिप्लोमा घेऊन बाहेर पडले. आणि घटश्राद्ध (१९७८) या पहिल्याचं चित्रपटानें राष्ट्रीय स्तरावर पोचले. १९७८ ते २०१२ या पंचवीस वर्षात गिरीशनी सातत्यानें १३ कन्नड चित्रपट दिग्दर्शित केले. त्यांच्या चित्रपट विश्वाचा वेध घेणारी ही लेखमाला**

## लेखांक आठवा

**या** दोन्ही दृश्यातला कथा आणि सिनेमातला तंतोतंतपणा पाहण्यासारखा आहे. सापाच्या वारुळापाशी यमुनाक्का एकट्याच बसल्या होत्या. त्यांचं अंग वारुळाला लागत होतं. एक हात वारूळात घालून त्या निश्चल बसल्या होत्या. ते पाहून मला भीती वाटण्याऐवजी वाटलं, मी तरी काय करणार? यमुनाक्का तर मरून गेल्या आहेत. लगोलग माझं सर्वांग शहारलं.

आत यमुनाक्कांना उघडं करून झोपवलं होतं. लघवीचा जागा मात्र झाकली होती. खालच्या पोटावर शेण थापलं होतं. त्यावर एक पणती ठेवली होती. ती पेटवल्यावर परबूंनी त्यावर एक पातेलं पालथं झाकलं. गर्भपाताच्या दृश्यात किंचित झालेला बदल म्हणजे परबूच्या ऐवजी बाईच सगळ्या गोष्टी करते. (१९२० काळ पाहताच हेच योग्य वाटते.) कथेमध्ये यमुनाक्कांच्या भूतकाळाबद्दल काही प्रमाणात मजकूर आला आहे. यमुनाक्काचं तसं झाल्यावर थोड्याच दिवसात तिचा नवरा साप चावून मरतो. शेषागिरी उडुपांची बायको वारल्यानंतर, वडिलांना बघायला कोणीतरी हवं म्हणून यमुनाक्का वडिलांजवळ येऊन राहते. हे शास्त्र-गमेश जोडीतला गणेश नानीला सांगतो. उडूपांचा लांबचा नातेवाईक. प्रत्यक्ष सिनेमात ह्याचा कोणताही विस्तार नाही. कथेत पुटरंगी नावाची रान कोकणी बाई ही परसदाराशी येऊन यमुनाक्काबरोबर गप्पा मारण्याचा उल्लेख आहे. तिने केलेल्या संवादाच्या ओळी कथेत आहेत. ज्या अप्रत्यक्षपणे यमुनाक्काच्या गरोदरपणाच्या आसपास घुटमळतात. त्याची जाणीव होऊन यमुनाक्काला रागसुद्धा येतो. ह्यापुट रंगीच्या जागेवर सिनेमात गोदाक्काच आपल्याला दिसते. असे काही किरकोळ अपवाद वगळता अनंतमूर्ती ह्यांची ही भारतीय साहित्यात महत्त्वाची ठरणारी, एकाच

वेळी अवघड (सिनेमासाठी) आणि सोपी वाटणारी कथा कासारवल्ली ह्यांनी सिनेमात सहजगत्या आणली आहे. ह्या प्रकारची तुलना 'सद्‌गती' (प्रेमचंद-सत्यजितरे) घटश्राद्ध (अनंतमुर्ती-कासारवल्ली) अशी करता येईल. ह्या दोन्ही कथा धर्मसत्तेबद्दल बोलतात हे विशेष. त्यातील काळही जवळपासच आहे.

'घटश्राद्ध' हा १९७७ मध्ये आलेला कन्नड सिनेमा. समांतर सिनेमाचा दबदबा असलेल्या काळात कासारवल्ली ह्यांनी वेगळ्या आशय-विषयाच्या जोरावर ह्या सिनेमाला भारतीय सिनेमाच्या (सर्वभाषिक मर्यादा मोडीत काढून) मुख्य धारेत आणून ठेवलं. 'फक्त बंगाली' असा जो समांतर सिनेमाचा तोंडवळा निर्माण होऊ लागला होता. त्याला वेळेतच थोपवून धरलं. धर्मसत्तेच्या अवकाशात नैतिक-अनैतिक गोष्टी कशा एकमेकांच्या विरोधात (म्हणजे यमुनाक्काचं विधवा असून गरोदर राहणं अनैतिक. शेषगिरी उडूप ह्यांनी कोवळ्या मुलींबरोबर लग्न करणं हे नैतिक) जातात. ही गोष्ट चांगल्या प्रकारे 'घटश्राद्ध'मध्ये दाखविण्यात आलेली आहे. ऐंशीच्या दशकात अशा अंगाने सिनेमात प्रतिक्रियात्मक होणे, तेही कर्नाटकामधल्या माणसानेही खूप महत्त्वाची आणि मोठी गोष्ट आहे. साचेबद्ध होत चाललेल्या त्या काळातल्या समांतर सिनेमाला वळण लावण्याचा हा प्रामाणिक प्रयत्नच म्हणायला हवा. कासारवल्ली ह्यांच्या ह्या पहिल्या सिनेमाचे महत्त्व अशा अनेक अंगांनी आहेच.

॥८॥

स्वातंत्र्यपूर्व काळ आणि स्वातंत्र्योत्तर काळाच्या आगेपिछे असणारा ताईसाहेबा (१९९७) हा कासारवल्ली ह्यांचा 'कथेचा विस्तार' अशा अर्थाने पाहता येईल. असा महत्त्वाचा सिनेमा. काळाच्या बदलत्या जागा, माणसाच्या अंगाने पाहता पाहता आपण काळालाच विसरून जातो आणि नर्मदाताईंच्या सुख-दु:खाशी एकरूप होतो. 'ताईसाहेबा'ची कथा नॉर्थ कर्नाटकातील जमखंडी तालुक्यांतील मनोर नावाच्या एका छोट्या वाडीत घडते. ही कथा आप्पासाहेब ह्यांच्या कुटुंबाची आहे. आप्पासाहेब हे स्वातंत्र्यसैनिक सतत चळवळीत असलेले. चळवळीनं भारावून गेलेले. आप्पासाहेबांची पत्नी नर्मदाताई, घराचा सगळा व्यवहार बघणारा व्यंकोबा हा दिवाणजी, नर्मदाताईंच्या सावलीला असलेली राधाक्का, दोन नोकर हे आप्पासाहेबांचं कुटुंब. त्यांच्यापासून फारकत घेऊन अध्यात्माच्या मागं लागलेल्या आप्पासाहेब सुद्धा आहेत. सततचं तुरुंगात जाणं आणि बाहेर येणं ह्यातच आप्पासाहेबांचा बराचसा काळ व्यापून गेलेला आहे. ह्याचा बरा वाईट परिणाम नर्मदाताईंवर झालेला आहे. आप्पासाहेब तुरुंगातनं सुटल्यावर. शरीर पातळीवरचे निर्माण होणारे चैतन्य कालांतराने नष्ट होते, जेव्हा त्यांना समजते की, आप्पासाहेब चंद्री नावाच्या बाईकडे जातात बारीक बारीक दु:खातून निर्माण झालेला एकटेपणा नर्मदाताई त्या तालात वाहून नेतात. पण ह्या मोठ्या दु:खानं त्यांच्या स्त्रीत्वाचा कायापालटच होतो. ह्यातनं सावरत असतानाच आप्पासाहेब त्यांच्यावर आणखी एक गोष्ट लादतात. ती म्हणजे मुलगा दत्तक घेण्याची. हा नर्मदाताईचा स्त्री म्हणून शेवटच. व्यंकोबाचा मुलगा नानू दत्तक घ्यायला नर्मदाताई तयार होतात. आप्पासाहेबांच्या कौटुंबिक जगाला दत्तक मुलाच्या आगमनाने कोणकोणत्या गोष्टीला तोंड द्यावे लागते आणि नर्मदाताई त्यातून कसा मार्ग काढतात, असा कथेचा मुख्य आशय कासारवल्ली कशाप्रकारे शेवटपर्यंत वाहून नेतात. हे पाहण्यासारखं आहे. 'ताईसाहेब' हा कासारवल्ली ह्यांचा सगळ्यात जास्त लांबीचा सिनेमा.

●●● (अपूर्ण)

प॰री॰क्ष॰ण

# बी.ए.पास

दिग्द. अजय बहल (२०१३/९७मि./हिन्दी)
कलाकार-शिल्पा शुक्ला,शादाब कमाल

**गेल्या** वर्षीच्या महत्त्वाच्या महोत्सवात उल्लेखनीय ठरलेला 'बी.ए.पास' चित्रपटाची जातकुळी वेगळी आहे. त्यांना प्रेक्षक प्रतिसाद ही वेगवेगळ्या पद्धतीने मिळणार तरीही हे चित्रपट व्यावसायिक रित्या प्रदर्शित करण्याची जोखीम घेणाऱ्या निर्माता वितरकांचं कौतुक करायला हवं. अजय बहल दिग्दर्शित 'बी.ए.पास' पाहताच दिग्दर्शक केवळ प्रेक्षकांच्या भावना चाळवणे एवढाच उद्देश नाही हे स्पष्ट होतं. सेक्स आणि पैसा यांच्या माध्यमातून वरच्या वर्गाने खालच्या वर्गावर सत्ता प्रस्थापित करणं आणि आणि यातून खालच्या वर्गातील व्यक्तीची झालेली परवड लैंगिक शोषणाच्या बळी केवळ स्त्रियाच नाही तर पुरुषही असू शकतो हा चित्रपट आपल्याला दाखवतो हे सूत्र अधोरेखित करणारा 'बी.ए.पास' आपल्याला अपरिचिति अशा जगाची ओळख करून देतो.

'रेल्वे आँण्टी' या मोहन सिक्का लिखित लघुकथेवर आधारीत 'बी.ए.पास', कथेतील आशयाशी प्रामाणिक राहून त्याचं सिनेमा माध्यमात किती चांगल्या तऱ्हेने रुपांतर करता येऊ शकतं याचं उत्तम उदाहरण आहे. मोहन सिक्काने दिल्लीतील पहाडगंज भागातील वास्तव्यात त्याला आलेल्या अनुभवांवर आधारीत 'रेल्वे ऑण्टी' ही कथा लिहिली होती. अजय बहलने कथेतील वातावरण दृश्य प्रतिमातून तंतोतंत उभं केलंय. कथेला पूरक असणारी उपकथानक आणि आशयाला गडद करणारा शेवट यातून दिग्दर्शकाने त्याला अपेक्षित परिणाम साधलाय. शेवट काहीसा भडक वाटला तरीही तो कथेच्या प्रवाहाला एक विशिष्ट विराम देतो. आई वडिलांच्या मृत्यूनंतर मुकेश (शादान कमाल) आत्याकडे पहाडगंज विभागातील रेल्वे कॉलनीत रहायला येतो. बी.ए.शिकणाऱ्या मुकेशला वसतीगृहात राहणाऱ्या त्याच्या बहिणींच्या भविष्याची चिंता आहे. आत्याच्या घरी पडेल ती काम करणारा मुकेश तिच्या सांगण्यावरून सारीका (शिल्पा शुक्ला) या रेल्वे अधिकाऱ्याच्या बायकोला भेटायला जातो. तरुण मुलांना आपल्या जाळ्यात ओढणाऱ्या सारीकाला मुकेशच्या रुपात एक सावज मिळतं. ती मुकेश कडून स्वत:च्या शरीराची भूक भागवतेच पण त्याला पैसे मिळवून देण्याच्या मिषाने श्रीमंत बायकांच्या घरी पाठवते. मुकेश एका विचित्र चक्रव्युहात सापडतो ज्यातून बाहेर पडण्याचा मार्ग त्याला विनाशाकडेच नेतो.

दिग्दर्शकाने केलेलं पहाडगंज भागाचं वास्तवदर्शी चित्रण आणि मुकेश, सारीका या प्रमुख व्यक्तिरेखांची अचूकपणे टिपलेली मानसिक आंदोलने ही 'बी.ए.पास'ची प्रमुख बलस्थान आहेत.

आत्याच्या घरी परकेपणाचं आयुष्य जगणारा व सारिकाच्या जाळ्यात अलगदपणे सापडलेला मुकेश शादाब कमालने कमालीच्या सहजपणे साकारलेला आहे. खरं तर कोणत्याही नवोदीत अभिनेत्यासाठी अशा प्रकारची भूमिका आव्हान असते. जिगोलंचं जगणं जगताना होणाऱ्या यातना, त्यातून आलेली अगतिकता शादाब ने खूप तीव्रपणे मांडलीय. त्यासाठी त्याला ऐशियन

संपादक : **सुधीर नांदगांवकर,** मुखपृष्ठ/मांडणी/व्यंगचित्र:**रघुवीर कुल**
मुद्रक,प्रकाशक:**संदीप मांजरेकर** छपाई :**रचनामुद्रण**,दादर,मुंबई-१४. Email : cinesudhir@gmail.com

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

**Vastav Roopwani** (Monthly) **August 2013** MH/MR/EAST/82/2012-14
21st year of Publication RNI No.59908/94

प्रति,

**प्रेषक : वास्तव रूपवाणी** प्रभात चित्र मंडळ, शारदा सिनेमा, दादर, मुंबई-४०००१४.

सिनेफॅन महोत्सवात सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कारही मिळालाय. शिल्पा शुक्लाच्या सारीकाच्या व्यक्तिरेखेला ही अनेक पैलू आहेत. ती मुकेशला केवळ स्वत:च्या शरीरसुखांसाठी वापरत नाही तर त्याच्याकडून शरीर विक्रीचा धंदा करून पैसाही कमावते. पारंपरिक वेश्या व्यवसायातील स्त्री –पुरुषांचे हे बदललेलं स्वरूप अस्वस्थ करणारं आहे. शिल्पा शुक्लाने साकारलेली ही बोल्ड सारीका आण्टी दीर्घकाळ लक्षात राहणारी झाली आहे. मुकेशच्या आयुष्यात आलेली एका रात्रीची प्रौढ स्त्री दिप्ती नवलने आपल्या नेहमीच्या लयीत केली आहे. तिला पुरुषाचा केवळ सहवास हवाय, सेक्स नको. मुकेशला त्याच्या गिऱ्हाईकांकडून आलेल्या अशा भल्याबुऱ्या अनुभवातून आपल्याला वेश्याव्यवसाय करणाऱ्या पुरुषांच्या जगाचं दर्शन होतं. एक अस्वस्थ करणारा अनुभव ही चित्रपट देतो हेच त्याचं श्रेय आहे.

**–संतोष पाठारे**

## प्रभात : ऑगस्ट महिन्याचे कार्यक्रम

१२ ऑगस्ट (सोम) **आभास**
(हिंदी/१९९६/१०३मि.)
दिग्द. बिजया जेना

२९ ऑगस्ट (गुरू) **जिस देश में गंगा बहती है**
(हिंदी/१९६०/१६७मि.)
दिग्द. राधु कर्मकार

**रंगस्वर, चव्हाण सेंटर सायं. ६.३०वा.**

२१ ऑगस्ट (बुध) **द साँग ऑफ स्पॅरो**
(इराण/२००८/९६मि.)
दिग्द. मजिद मजिदी ६.००
आणि
**लव अॅट ४०**
(इराण/२०१२/९८मि.)
दिग्द. ए. रायसीन ८.००

२२ ऑगस्ट (गुरू) **फॅमेली बॉन्ड**
(इराण/२०११/११०मि.)
दिग्द. नादीर मोगादस

**दादर माटुंगा कल्चरल सेंटर सायं. ६.३०वा.**

## फा य न ल क ट

**रघुवीर कुल**

**सिनेमा चांगला असेल तर 'दुनियादारी' येते**

